सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १४३ | शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. विनोद लांबोळे

माजी उपनगराध्यक्ष



श्री. विनोद जाधव

जाधव इंग्लिश क्लासेस



श्री. पंकज भावसार

सामाजिक कार्यकर्ते

## दिनविशेष

१३ फेब्रुवारी

- चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक यश चोप्रा यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!



अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरातील श्री स्वामी समर्थ व श्री अनघालक्ष्मी-श्री गुरुदत्त महाराजांच्या मंदिर परिसरात गुरुवारी श्री गुरुचरित्र ग्रंथ सामूहिक पारायणात सहभाग नोंदविलेले ठिकठिकाणचे भाविक.

# श्रद्धा, भक्ती अन् सामूहिकतेचा दिसला मंगल संगम

## ४५९ भक्तांच्या सहभागातून श्री गुरुचरित्र ग्रंथ सामूहिक पारायण उत्साहात

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरातील श्री स्वामी समर्थ व श्री अनघालक्ष्मी-श्री गुरुदत्त महाराजांच्या मंदिर परिसरात गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी आयोजित श्री गुरुचरित्र ग्रंथ सामूहिक पारायण सोहळ्याला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी सहा ते दुपारी चार या वेळेत चाललेल्या या धार्मिक कार्यक्रमात ठिकठिकाणच्या एकूण ४५९ भक्तांनी सहभाग नोंदवत श्रद्धा, भक्ती आणि सामूहिक साधनेचा अनोखा अनुभव घेतला. तब्बल दहा तास चाललेल्या या कार्यक्रमाने मंदिर परिसरात भक्ती आणि सकारात्मक उर्जेची मंगलमय अनुभूती असंख्य भक्तांना आल्याचे पाहावयास मिळाले.





### वेदमंत्रांच्या गजराने शुभारंभ

कार्यक्रमाचा प्रारंभ सकाळी वेदमंत्रांच्या गजरात व श्री सिद्धिविनायक गणेशजी, मंगळेश्वर श्री पंचमुखी हनुमानजी, मंगळेश्वरी श्री भूमी माता व श्री मंगळग्रह देवतेच्या आरतीने झाला. यावेळी गणेश पूजनासह विविध देवतांना आवाहन करण्यात आले. वेदमंत्रांच्या गजरात आणि दत्त नामाचा जयघोष करण्यात आला. अमळनेर व चोपडा येथील महिला अनुक्रमे जया पाटील व भारती भदाणे तसेच पुरुष भक्त सोनू पाटील यांच्या उपस्थितीत विधिवत पूजा होऊन श्री गुरुचरित्र ग्रंथाचे वाचन सुरू झाले. याप्रसंगी लहानग्यांनीही एकाग्र होऊन पारायणाची अनुभूती घेतली.

### नियोजनबद्ध वाचन, भक्तांचा सहभाग

श्री गुरुचरित्राच्या संपूर्ण ग्रंथाचे नियोजनबद्ध अध्यायवार वाचन करण्यात आले. तसेच श्री गुरुचरित्रातील आदर्श जीवनमूल्ये आजच्या काळातही तितकीच महत्त्वाची आहेत, असे संबंधितांकडून ओघवत्या शैलीत व सहज-सुंदर शब्दांत सांगण्यात आले.

### आध्यात्मिक उन्नतीचा अनुभव

सामूहिक पारायणामुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि मनःशांती लाभते, अशी भावना उपस्थित भक्तांनी याप्रसंगी व्यक्त केली. श्री गुरुचरित्र वाचनातून संयम, श्रद्धा आणि सदाचार यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित होते, अशी प्रतिक्रियाही यावेळी भक्तांनी व्यक्त केली.

### महाप्रसादाने समारोप

श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायणासाठी आलेल्या सर्व भक्तांसाठी मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे सकाळी साबूदाणे, खोबरा-मावाबर्फी, केळी व चहा देण्यात आला. तसेच समारोपानंतर वरण, भात, बेंगनफ्राय, मटकी रश्श्याची उसळ, पुरी, गावरान तुपातील केशर जिलेबी, पापड, सलाद या महाप्रसादाचा सर्व भक्तांनी आस्वाद घेतला. श्री स्वामी समर्थांच्या भक्तांनी सामूहिक पारायण सोहळा यशस्वितेसाठी बहुमोल श्रम घेतले.

### मंगलमय '९' ची प्रचिती!

पारायणाला ४५९ स्त्री-पुरुष भाविक बसले होते. श्री मंगळग्रहाचा शुभांक '९' आहे. ४५९ या अंकाची बेरीजही '९' येते. मंदिरात झालेल्या पहिल्याच पारायणाला जणू साक्षात श्री मंगल देवतेने '९' च्या माध्यमातून प्रचिती दिल्याचे सर्वांनी अनुभवले. आता दरवर्षी हे पारायण नियमित होणार आहे. तसेच चैत्र नवरात्रोत्सवानिमित्त सप्तशतीचे पाठ व्हावेत, अशी इच्छा उपस्थित अनेक भाविकांनी व्यक्त केली. मंगळग्रह सेवा संस्थेने या इच्छेचा आदर राखत हा देखील कार्यक्रम नक्की करू, असे आश्वासन दिले.

### चोपड्यातील भक्तांसाठी बस व्यवस्था

श्री गुरुचरित्र ग्रंथ सामूहिक पारायणासाठी अमळनेरसह धुळे, शिंदखेडा, चोपडा, शिरपूर, बोराडी, पारोळा, पाचोरा यासह विविध ठिकाणांहून भक्तांची सहभाग नोंदविला होता. त्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी अमळनेर येथील आगारप्रमुख श्री. प्रमोद चौधरी यांनी मंगळग्रह सेवा संस्थेच्या विनंतीला मान देऊन तत्काळ श्री मंगळग्रह मंदिरापासून बस उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे भाविकांना बसस्थानकावर जावे लागले नाही. परिणामी त्यांची गैरसोय टळली. या सामाजिक जाणिवेचे भान ठेवत मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे आगारप्रमुख तसेच बसवाहक व चालक आर. आर. सोनार व किरण पारधी यांचे आभार मानले आहेत.

# चारचाकीने धडक दिल्याने दुचाकीवरील दोघांचा मृत्यू

## धरणगाव रस्त्यावरील घटना; गुन्हा दाखल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथून धरणगावला जाणाऱ्या रस्त्यावर चारचाकीच्या धडकेत दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाला. ही घटना ९ फेब्रुवारी रोजी घडली. या घटनेप्रकरणी चारचाकी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



९ फेब्रुवारी रोजी नरेंद्र राजू चव्हाण (वय ३९, रा. धरणगाव) व विश्वास रोहिदास सोनवणे (वय ४१, रा. भाडणे, ता. साक्री) हे दुचाकीवरून (एमएच १९-बीडी ६६७९) धरणगावकडे जात असताना संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास धरणगाव रोडवरील बुलडाणा अर्बन बँकेच्या गोडाऊनजवळ समोरून येणाऱ्या महिंद्रा बोलेरो पिकअप (एमएच ३९- एडी ३११९) ने समोरून धडक दिली. त्यात दोघे गंभीर जखमी होऊन त्यातच त्यांचा मृत्यू झाला. अमोल राजू चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बोलेरो पिक-अप चालकाविरुद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. उपनिरीक्षक नामदेव बोरकर पुढील तपास करीत आहेत.

# 'आरटीई'ची नोंदणी प्रक्रिया पूर्ण; वेळापत्रकाची आता प्रतीक्षा

## जिल्ह्यातील २५१ शाळांमध्ये यंदासाठी ३३१० जागा उपलब्ध

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील बालकांना मोफत शिक्षणाचा हक्क देणाऱ्या 'आरटीई'अंतर्गत २०२६-२७ या शैक्षणिक वर्षांसाठीच्या २५ टक्के राखीव प्रवेश प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. त्या अनुषंगाने जळगाव जिल्ह्यातील शाळांची नोंदणी प्रक्रिया आता पूर्णत्वास आली असून, प्रशासकीय स्तरावर पुढील तयारी सुरू आहे. आता वेळपत्रक कधी जाहीर होते याबाबत प्रतीक्षा आहे.




जळगाव जिल्ह्यात यंदा २५१ शाळा अंतिम झाल्या असून, ३३१० जागा उपलब्ध असणार आहेत. अद्याप विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन नोंदणीचे अधिकृत पत्र प्राप्त झाले नसले तरी ऐनवेळी धावपळ होऊ नये म्हणून पालकांनी कागदपत्रे तयार ठेवावीत. यात निवासाचा पुरावा म्हणून रेशन कार्ड, आधार कार्ड, वीजबिल, टेलिफोन बिल किंवा भाडे करार (नोंदणीकृत), जन्माचा दाखला, उत्पन्नाचा दाखला ज्यात पालकांचे उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असल्याचे तहसीलदारांचे प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, आधार कार्ड द्यावे. यात विद्यार्थी आणि पालकांचे आधार कार्ड अपडेट असावे.

**तालुकानिहाय संख्या**

तालुक्याचे नाव, शाळा व कंसात उपलब्ध जागांची संख्या याप्रमाणे- जळगाव शहर ३५ शाळा (५६२ जागा), जळगाव तालुका २० (२७९), अमळनेर १५ (१५७), भडगाव १६ (१४३), भुसावळ १९ (३८२), बोदवड ४ (३०), चाळीसगाव २७ (३२३), चोपडा १४ (१५९), धरणगाव ९ (१००), एरंडोल १३ (११६), जामनेर १० (१४८), मुक्ताईनगर १० (१२४), पाचोरा १६ (२६८), पारोळा ९ (९३), रावेर १९ (३०९), यावल १५ (११७).

# श्री गोविंद महाराज पुण्यतिथीनिमित्त आजपासून धार्मिक कार्यक्रम

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : संतश्री सद्गुरू सखाराम महाराज विठ्ठल-रुख्मिणी संस्थान, अमळनेरचे द्वितीय सत्पुरुष श्री गोविंद महाराज यांची पुण्यतिथी व महाशिवरात्रीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारीपासून माघ वद्य अमावास्या मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत हा सोहळा वाडीतील मंदिरात भक्तिमय वातावरणात होणार आहे.

रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्रीनिमित्त सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रुद्रयाग स्वाहाकार आयोजित केला आहे. यावेळी वेदाचार्य अभयशास्त्री जोशी (वेद पाठशाळा) यांचे पौरोहित्य लाभणार आहे. दैनंदिन कार्यक्रमांत पहाटे ५ ते ६ काकड आरती, सकाळी ७ ते दुपारी १२ चरित्र पारायण, सायंकाळी ५ ते ६ रामरक्षा व स्तोत्रपठण, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, तसेच रात्री ८.३० ते १०.३० हरिकीर्तन असा समावेश आहे. पारायण व्यासपीठाचे नेतृत्व ह.भ.प. शारंगधर गुरुजी व ह.भ.प. गोपाल गुरुजी (वारकरी पाठशाळा, अमळनेर) करणार आहेत. कीर्तन सोहळ्यात ह.भ.प.चत्रभुज बुवा (धरणगाव), ह.भ.प. रमाकांत बुवा (सटाणा), ह.भ.प. सारंगधर बुवा (अमळनेर) व ह.भ.प. माधवदास बुवा राठी (नाशिक) यांची कीर्तने होणार आहेत. तसेच परमपूज्य गुरुवर्य प्रसाद महाराज यांच्या परंपरेतील काल्याचे भजन सादर होणार आहे.

पारायणास बसणाऱ्या भाविकांनी संस्थानाच्या कार्यालयात नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पारायणकर्त्यांनी स्वतःचा ग्रंथ सोबत आणावा. ग्रंथ नसल्यास संस्थानातर्फे पारायण समाप्तीपर्यंत तो उपलब्ध करून देण्यात येईल. मात्र पारायणानंतर तो संस्थानात जमा करणे आवश्यक राहील.

## संपादकीय

# गेट टुगेदर : आनंदी आयुष्याचे प्रभावी औषध

आजच्या धकाधकीच्या, स्पर्धात्मक आणि ताणतणावाने भरलेल्या जीवनात माणूस यशाच्या शिखराकडे धावत आहे. परंतु या धावण्यात तो नकळत नात्यांपासून, मित्रांपासून आणि स्वत:पासूनही दूर जात आहे. अशा वेळी 'गेट टुगेदर' ही केवळ भेट नाही, तर मनाला उभारी देणारे एक प्रभावी औषध आहे, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. आयुष्य मर्यादित आहे. या जगातून जाताना आपण कोणतीच भौतिक वस्तू सोबत घेऊन जाऊ शकत नाही. मग आयुष्यभर काटकसर करून, आनंद पुढे ढकलून, केवळ भविष्याची चिंता करत जगण्यात अर्थ काय? ज्या गोष्टींमधून आपल्याला खरा आनंद मिळतोमित्रांची भेट, कुटुंबीयांसोबतचा सहवास, एखादा छोटासा प्रवास, एखादी आवड जोपासणेत्या गोष्टींसाठी वेळ आणि पैसा खर्च करणे ही उधळपट्टी नसून आयुष्य समृद्ध करण्याची गुंतवणूक आहे. आपण गेल्यानंतर लोक काय म्हणतील, पुढे काय होईल, याची अतीचिंता करण्यापेक्षा वर्तमान क्षणाचा आस्वाद घेणे अधिक महत्त्वाचे आहे. मुलांवर प्रेम करा, त्यांना योग्य संस्कार द्या; परंतु त्यांच्या स्वप्नांचे ओझे स्वत:च्या खांद्यावर वाहू नका. त्यांना स्वत:चा मार्ग निवडू द्या. त्याचबरोबर स्वत:साठीही काही क्षण राखून ठेवा.

जन्मापासून मृत्यूपर्यंत केवळ कष्ट करत राहणे म्हणजे आयुष्य नव्हे. विशेषत: साठीनंतर आयुष्याचा वेग आणि प्राधान्यक्रम बदलणे आवश्यक ठरते. आरोग्याची किंमत पैशापेक्षा अधिक असल्याची जाणीव या टप्प्यावर प्रकर्षाने होते. किती पैसा पुरेसा आहे आणि कमाईची शर्यत कधी थांबवायची, याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. शेकडो एकर जमीन असली तरी पोट भरण्यासाठी थोडेच अन्न पुरते. अनेक घरे असली तरी झोपण्यासाठी एकच खोली पुरेशी असतेही जाणीव समाधान शिकवते. आनंद हा आयुष्याचा खरा नफा आहे. आनंदाशिवाय गेलेला प्रत्येक दिवस हा गमावलेला दिवस आहे; तर हास्य, मैत्री आणि समाधानाने गेलेला दिवस ही खरी कमाई आहे. खेळकर, सकारात्मक स्वभाव मनाला आणि शरीराला सुदृढ ठेवतो. ताण, राग आणि नकारात्मकता यांना दूर सारून जीवनाकडे आशावादी दृष्टीने पाहणे हीच आरोग्याची गुरुकिल्ली आहे.

मित्र-मैत्रिणी हे आयुष्याचे अनमोल धन आहे. त्यांच्याशी संपर्कात राहणे, वेळोवेळी भेटणे, संवाद साधणेही मनाला उभारी देणारी प्रक्रिया आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे संपर्क साधणे सोपे झाले आहे; परंतु केवळ संदेश नव्हे, तर प्रत्यक्ष भेटीतून जपलेले नाते अधिक घट्ट होत असते. कारण डोंगराआड गेलेला सूर्य पुन्हा उगवू शकतो, पण दुरावलेली माणसे परत मिळतीलच याची खात्री नसते. म्हणूनच गेट टुगेदर ही चैनीची बाब नाही; ती मानसिक आरोग्याची गरज आहे. आयुष्य खरोखरच कमी आहेते आनंदाने, प्रेमाने आणि मैत्रीच्या उबेत जगा. मित्र जपा, नाती जपा आणि शक्य तितक्या वेळा एकत्र या. कारण शेवटी आठवणींची शिदोरीच आयुष्याला खऱ्या अर्थाने समृद्ध बनवते.

# मोबाईल, टीव्ही पाहत जेवणे आरोग्यासाठी घातक

## विविध शारीरिक, मानसिक व्याधींना निमंत्रण; वैद्यकीय तज्ज्ञांचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आजच्या धावपळीच्या जीवनात मोबाईल, टीव्ही किंवा टॅबसमोर बसून जेवण करण्याची सवय सर्वसामान्य झाली आहे. मात्र ही सवय निरुपद्रवी नसून दीर्घकाळात अनेक शारीरिक व मानसिक व्याधींना कारणीभूत ठरू शकते. अनेकजण घाईघाईने आणि अन्नाचे घास कमी चावून जेवतात. ही सवय पचनक्रियेसाठी अत्यंत घातक असून, लठ्ठपणा, मधुमेह आणि फॅटी लिव्हरसारख्या गंभीर आजारांना निमंत्रण देणारी आहे, असा इशारा वैद्यकीयसह आहारतज्ज्ञ आणि मानसोपचारतज्ज्ञांनी दिला आहे.

**जास्त खाण्याची प्रवृत्ती वाढते**

मोबाईल, टीव्ही स्क्रीनकडे लक्ष केंद्रित झाल्याने मेंदूचे अन्नाकडे असलेले लक्ष कमी होते. त्यामुळे पोट भरल्याची जाणीव उशिरा होते आणि नकळत जास्त अन्न सेवन केले जाते. यामुळे लठ्ठपणा, वाढलेले वजन आणि पुढे जाऊन मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांचा धोका वाढतो.

**पचनसंस्थेचे विकार**

जेवताना शांतपणे, चावून-चावून खाणे आवश्यक असते. मात्र मोबाईल किंवा टीव्ही पाहताना घाईघाईत गिळण्याची सवय लागते. यामुळे अपचन, ॲसिडिटी, गॅस, बद्धकोष्ठता यांसारखे त्रास उद्‌भवू शकतात. काही प्रकरणांमध्ये पोटदुखी व आम्लपित्त वाढल्याची तक्रार डॉक्टरांकडे येत असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

**मानसिक आरोग्यावर परिणाम**

स्क्रीनवरील सततचा उत्तेजक मजकूर, सोशल मीडियावरील माहिती किंवा मालिकांतील भावनिक दृश्ये यांचा परिणाम मनावर होतो. जेवण ही शांत, समाधानाची प्रक्रिया असताना ती तणावपूर्ण किंवा विचलित करणारी ठरते. दीर्घकाळात एकाग्रतेचा अभाव, चिडचिडेपणा आणि तणाव वाढू शकतो.

**मुलांमध्ये वाढता धोका**

बालरोगतज्ज्ञांच्या मते लहान मुलांना मोबाईल दाखवून जेवण घालण्याची पद्धत चिंताजनक आहे. यामुळे मुलांची नैसर्गिक भूक तृप्तीची संवेदना कमी होते. तसेच भाषाविकास, सामाजिक कौशल्ये आणि कुटुंबीयांशी संवाद यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. पुढे जाऊन मुलांमध्ये स्थूलता आणि



दृष्टिदोषाचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते.

**कुटुंबातील संवादात घट**

पूर्वी कुटुंबातील सदस्य एकत्र बसून गप्पा मारत जेवत असत. आता प्रत्येकाच्या हातात मोबाईल असल्याने संवाद कमी झाला आहे. यामुळे कुटुंबातील भावनिक नाते कमकुवत होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

> “ जेवणावेळी स्क्रीनकडे लक्ष असल्याने अन्न नीट चावले जात नाही. त्यामुळे पचनसंस्थेवर ताण येतो. मेंदूला तृप्तीचा सिग्नल उशिरा मिळतो. परिणामी जास्त जेवण होते व वजन वाढते. लठ्ठपणा, ॲसिडिटी, गॅसचे त्रास वाढू शकतात. मुलांमध्ये ही सवय अधिक धोकादायक मानली जाते. डोळ्यांवर व मेंदूवर अतिरिक्त ताण येतो. मन एकाग्र नसल्याने जेवणाचा पोषण फायदा कमी होतो. कुटुंबीयांसोबतचा संवादही कमी होतो. त्यामुळे मानसिक परिणाम होत असल्याने जेवताना फक्त जेवणावरच लक्ष द्यावे, स्क्रीनकडे पाहणे टाळावे.
> – **डॉ. अतुल चौधरी,** अमळनेर.



*विविध कलाविष्कार सादर करताना विद्यार्थी.*

# सप्तरंगांची उधळण करत विविध कलाविष्कार सादर

## पीबीए इंग्लिश मीडियम स्कूलचे ४८ वे स्नेहसंमेलन उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील शैक्षणिक वैभवशाली परंपरा जपणाऱ्या पीबीए इंग्लिश मीडियम स्कूलचे नुकतेच वार्षिक स्नेहसंमेलन झाले. विशेष म्हणजे हे स्नेहसंमेलन प्रेक्षक, दर्शक व पालकांसाठी आनंदाची अनुभूती देणारी एक पर्वणी ठरत असते. या विद्यालयाचे यंदाचे हे ४८ वे वार्षिक स्नेहसंमेलन होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा हा कार्यक्रम ठरत असतो. यंदा सप्तरंगांची उधळण करीत विविध कलाविष्कारांचे विद्यार्थ्यांकडून सादरीकरण झाले.

खान्देश शिक्षण मंडळाचे समस्त पदाधिकारी, कार्यकारी संचालक मंडळ व मान्यवरांच्या उपस्थितीत औपचारिकरित्या उद्‌घाटन झाले. खान्देश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्ष कमल कोचर, कार्याध्यक्ष नीरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन, कार्यकारी सदस्य प्रदीप अग्रवाल, हरी भिका वाणी, योगेश मुंदडे, पीबीए इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष डॉ. संदेश गुजराथी, पंकज मुंदडे, सौ. लीना पाटील, संस्थेचे सचिव प्रा. पराग पाटील, प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव व शिक्षक प्रतिनिधी राहुल पाटील यावेळी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विद्यार्थिनी व नामांकित स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सौ. सोनल प्रसाद चेडे (महाजन) होत्या.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला सर्व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्याचबरोबर साने गुरुजी, श्री पुसालाल बालचंद अग्रवाल व श्रीमंत प्रतापशेठजी या विभूतींच्या प्रतिमेस वंदन करून माल्यार्पण करण्यात आले.

या वर्षाच्या स्नेहसंमेलनाची संकल्पना मानवी मनाचा व गुणांचा वेध घेणारी असल्याने त्यास 'तरंग' असे नाव देण्यात आले होते. यात नृत्यकला, नाट्याभिनय या संकल्पनांची अनुभूती सर्व प्रेक्षकांना घडली. या नृत्य, नाट्यविष्कारामध्ये सामूहिक स्वरूपातील लोकनृत्य, लोकगीत, जुने-नव्या गाण्यांवरील नृत्य, ऐतिहासिक महानाट्य तसेच सामाजिक जनजागृती व प्रबोधन करणारे नाटिका समाविष्ट होत्या. तसेच याच कालखंडामध्ये फ्लॉवर डेकोरेशन, बिस्कीट डेकोरेशन, रांगोळी स्पर्धा तसेच विद्यार्थ्यांचे अप्रतिम चित्रांचे व तयार केलेल्या कलाकृतींचे आर्ट गॅलरी तयार केली जाते. जे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचा मंत्र या कलाकृतीतून दिला जातो. एक सच्चा कलाकार समाजासमोर यावा, ही यामागील भावना विद्यालयाची असते. यामध्ये परीक्षक म्हणून ॲड. भारती अग्रवाल, सुरेखा बाविस्कर, शीतल सावंत व योगेश पाटील होते. तसेच मुख्याध्यापक जे. एस. देवरे यांनी वर्षभरात शाळेमधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त केलेला सन्मान पुरस्कारांची तसेच उल्लेखनीय कार्यावर प्रकाशही वार्षिक अहवालातून टाकला. सदर कार्यक्रमासाठी शाळेचे चेअरमन डॉ. संदेश गुजराथी, पर्यवेक्षक महेश माळी, पर्यवेक्षिका मीनाक्षी बारी, व्ही. जी. बोरोले, व्ही. पी. बडवे, प्रशांत वंजारी, योगिनी ओवे, भावना चौधरी, योगीता पाटील, प्रतिमा ठाकूर, व्ही. एस. अमृतकर, योगीशा महाजन, अनंत बागल, प्रिया शहा, करिष्मा जैन, विनायक सूर्यवंशी यांच्यासह समस्त शिक्षक वृंद व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



*अमळनेर : पीबीए इंग्लिश मीडियम स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलच्या उद्‌घाटनप्रसंगी उपस्थित खान्देश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्ष कमल कोचर, कार्याध्यक्ष नीरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन, कार्यकारी सदस्य प्रदीप अग्रवाल, हरी भिका वाणी, योगेश मुंदडे, पीबीए इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष डॉ. संदेश गुजराथी, पंकज मुंदडे, सौ. लीना पाटील, संस्थेचे सचिव प्रा. पराग पाटील, प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव व शिक्षक प्रतिनिधी राहुल पाटील, प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विद्यार्थिनी व नामांकित स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सौ. सोनल प्रसाद चेडे (महाजन).*

# भाड्याच्या घरावर फिरवला जेसीबी; गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील न्यू प्लॉट परिसरात भाड्याने राहत असलेल्या कुटुंबाचे दोन पत्र्याचे रूम जेसीबीच्या सहाय्याने पाडण्यात आले. ही घटना मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी सरजूशेठ गोकलाणी, महेश देशमुख व इतर चार ते पाच जणांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबतची माहिती अशी, की फिर्यादी हे पत्नी कल्पना व मुलगी कोमल यांच्यासह संबंधित ठिकाणी सुमारे ७५ ते ८० वर्षांपासून भाड्याने राहत आहेत. शेती व्यवसायावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. संबंधित रूमसाठी त्यांच्या नावावर वीजमीटर व नगरपालिकेचे नळ कनेक्शनही आहे. त्याचे बिल व पाणीपट्टी ते नियमित भरतात. घटनेच्या दिवशी फिर्यादी धानोरा (ता. अमळनेर) येथील शेतात असताना शेजारील बाळासाहेब देशमुख यांनी फोनवरून त्यांच्या घरावर जेसीबी फिरविला जात असल्याची माहिती दिली. त्यानंतर पत्नीनेही फोन करून श्री. गोकलाणी यांच्या सांगण्यावरून काही व्यक्ती व महेश देशमुख घर पाडत असल्याचे सांगितले. सदर प्रकार थांबविण्याचा प्रयत्न केला असता संबंधितांनी शिवीगाळ व ठार मारण्याची धमकीही दिल्याचे सांगितले. त्यानंतर फिर्यादी तातडीने घटनास्थळी पोहोचले असता दोन्ही रूम जमीनदोस्त झाल्याचे दिसून आले. घरातील लोखंडी गोदरेज कपाट, लोखंडी व स्टील रॅक, गॅस शेगडी, कूलर, दोन पंखे आदी सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यासंदर्भात संबंधितांविरुद्ध जबरदस्तीने प्रवेश करून पाडकाम, मालमत्तेचे नुकसान, शिवीगाळ व दमदाटी केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेची माहिती वरिष्ठांना देण्यात आली असून, अहवाल न्यायालयात पाठविण्यात आला आहे. पोलीस निरीक्षकांच्या आदेशाने सहाय्यक उपनिरीक्षक समाधान गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# तेलगी प्रकरणाची आठवण पुन्हा ताजी

## बनावट स्टॅम्प छपाईचा काळाबाजार उघड; पाच आरोपी अटकेत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तेलगी प्रकरणानंतर स्टॅम्प सुरक्षाव्यवस्थेत सुधारणा करण्यात आल्या असतानाही बनावट स्टॅम्पचा गैरप्रकार सुरू असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. भारतीय डाक विभागाच्या नावाने बनावट पोस्टल स्टॅम्प तयार करून देशभर विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत बिहार व दिल्ली येथून आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून २७ लाख ८४ हजार २०० रुपयांचे बनावट पोस्टल स्टॅम्प जप्त करण्यात आले आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मुंबईतील राकेश बिंद, बिहारमधील शमशोद्दीन गफार व शाहिद रजा, दिल्लीतील मोहम्मद शहाबुद्दीन शेख तसेच गाझियाबाद येथील विरेंदर प्रसाद यांचा समावेश आहे.

१२ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबई जी.पी.ओ.चे डाक निरीक्षक आशुतोष जमादारसिंह कुमार यांनी दिलेल्या तक्रारीवरून मा.रा.आ. मार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान तांत्रिक विश्लेषण तसेच जी.पी.ओ. कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ही टोळी बनावट पोस्टल स्टॅम्प छापून कुरिअरमार्फत विविध राज्यांत पाठवत असल्याचे निष्पन्न झाले.

धक्कादायक बाब म्हणजे आरोपींच्या बँक खात्यांची तपासणी केली असता ७ ते ८ कोटी रुपयांची संशयास्पद आर्थिक उलाढाल आढळून आली आहे. या रकमेवरून हा गैरप्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिस आता या रॅकेटमधील इतर साथीदारांचा शोध घेत आहेत. या गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार दिल्ली व उत्तर प्रदेशमध्ये असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. आरोपी अटकेच्या भीतीने वारंवार मोबाईल क्रमांक व वास्तव्य बदलत असल्याने तपासात अडथळे येत होते. अखेर पोलिस पथकाने दिल्लीत सलग १४ दिवस पाळत ठेवून गोपनीय कारवाई करत आरोपींना अटक केली. या मोठ्या कारवाईमुळे देशभरात गाजलेल्या तेलगी स्टॅम्प घोटाळ्याची आठवण पुन्हा ताजी झाली आहे. शासनाची फसवणूक करणाऱ्या या रॅकेटचा तपास अधिक व्यापक करण्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.


Mundada Foundation's

## SHRI. N.T MUNDADA GLOBAL VIEW SCHOOL

**Behind Civil Court, Near Water Tank, Amalner 425401**
**Jalgaon Dt. Ph: 02587 – 222202**
**C.B.S.E. AFFILIATION NO. 1131481**

### Wanted Teachers

Looking for Energetic and passionate Educators with Fluency in the English Language.

| Section | Subject | Eligibility |
|---|---|---|
| | Co-Ordinator | M.A./M.Sc. B.Ed |
| Pre -Primary | | Any Graduation with T.T.C / Montessori training / B.Ed. |
| Primary | English, Social Studies | M.A, B.Ed. |
| | Mathematics, Science | B.Sc./M.Sc., B.Ed. |
| Secondary | English, Social Studies Sanskrit, | M.A, B.Ed. |
| | Mathematics, Science | B.Sc./M. Sc., B.Ed |
| Non-Teaching | Aunty Watchman | S.S.C |

Your application will be much appreciated fulfilling the following criteria.

- **Passport size photographs**
- **Complete Resume**
- **Minimum 2 years of experience**
- **English Fluency is Must**
- **Experience Certificate mentioning last drawn salary**
- **Salary will not be a constraint for the deserving candidates**
- **CBSE Experience is compulsory**

*** Handwritten Application**
*** Original Certificate**
*** Computer Knowledge**

**Date of Interview: 15/02/2026**
**Time 9.15am onwards**

**Venue: Shri. N.T.Mundada Global View School**

**Mr. Lakshman L**
**Principal**

**Mrs. Chhaya O. Mundada**
**Chairperson**

**Admission Open 2026-27 Play Group & Nursery**


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com




# सरोजिनी नायडू : काव्य आणि राष्ट्रसेवेचा प्रेरणादायी संगम

जयंती विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अग्रगण्य नेत्या, प्रख्यात कवयित्री आणि प्रभावी वया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरोजिनी नायडू यांची जयंती १३ फेब्रुवारी रोजी देशभर साजरी केली जाते. 'भारतीय कोकिळा' म्हणून प्रसिद्ध असलेल्या सरोजिनी नायडू यांनी आपल्या काव्यप्रतिभेने आणि राष्ट्रभक्तीने भारतीय जनतेच्या मनावर अमिट छाप सोडली. त्यांचे जीवन हे साहित्य, समाजकार्य आणि स्वातंत्र्यलढा यांचा अद्वितीय संगम होते.

### बालपण आणि शिक्षण

सरोजिनी नायडू यांचा जन्म १३ फेब्रुवारी १८७९ रोजी हैदराबाद येथे झाला. त्यांचे वडील डॉ. अघोरनाथ चट्टोपाध्याय हे विद्वान वैज्ञानिक आणि शिक्षणतज्ज्ञ होते, तर आई वरदासुंदरी या बंगाली कवयित्री होत्या. घरातच साहित्यिक आणि बौद्धिक वातावरण असल्यामुळे सरोजिनी यांच्यात लहानपणापासूनच काव्यलेखनाची आवड निर्माण झाली. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी त्यांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. पुढे त्यांनी इंग्लंडमधील किंग्ज कॉलेज, लंडन आणि गिर्टन कॉलेज, केंब्रिज येथे शिक्षण घेतले.

### काव्यप्रतिभेची झेप

सरोजिनी नायडू यांच्या कवितांमध्ये भारतीय संस्कृती, निसर्ग, प्रेम आणि राष्ट्रभक्ती यांचा सुरेख संगम आढळतो. त्यांचे 'दि गोल्डन थ्रेशोल्ड', 'दि बर्ड ऑफ टाइम' आणि 'दि ब्रोकन विंग' हे काव्यसंग्रह विशेष गाजले. त्यांच्या कवितांमध्ये भारतीय जीवनाचे जीवंत चित्रण आढळते. त्यांच्या सुरेल व ओजस्वी भाषेमुळे त्यांना 'भारतीय कोकिळा' ही उपाधी लाभली.

### स्वातंत्र्यलढ्यातील योगदान

कवयित्री म्हणून प्रसिद्धी मिळाल्यानंतर त्यांनी आपले जीवन राष्ट्रसेवेसाठी अर्पण केले. महात्मा गांधी यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्या स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय झाल्या. असहकार आंदोलन, सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलनात त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यांच्या प्रभावी भाषणांनी अनेकांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. १९२५ साली त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा झाल्या. काँग्रेसच्या अध्यक्षपदावर विराजमान होणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या. स्वातंत्र्यानंतर १९४७ मध्ये त्यांची उत्तर प्रदेशच्या राज्यपालपदी नियुक्ती झाली. त्या भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल होत्या.

### महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्य

सरोजिनी नायडू यांनी महिलांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठीही मोठे योगदान दिले. महिलांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना नेतृत्वाची प्रेरणा मिळाली.

### प्रेरणादायी वारसा

२ मार्च १९४९ रोजी त्यांचे निधन झाले; परंतु त्यांचे विचार आणि कार्य आजही प्रेरणादायी ठरतात. त्यांचे जीवन आपल्याला सांगते की साहित्य आणि समाजकार्य यांचा संगम साधून राष्ट्रनिर्मितीत मोलाचे योगदान देता येते. सरोजिनी नायडू यांची जयंती ही केवळ स्मरणदिन नसून त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्याचा आणि त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा दिवस आहे. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजसेवा, स्त्रीसक्षमीकरण आणि राष्ट्रप्रेम यांचा वारसा पुढे नेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.



दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र अभिवादन!

# क्यों नहीं खानी चाहिए बासी आटे की रोटी?

जान लें इसके अशुभ प्रभाव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

क्या आप जानते हैं कि ज्योतिष में रोटी का संबन्ध ग्रहों से बताया गया है, इसको लेकर नियम भी बताए गए हैं। गरुड़ पुराण और धर्मसिंधु में इन नियमों का जिक्र मिलता है।

हिंदू धर्म में रसोई को सिर्फ भोजन बनाने की जगह नहीं माना गया, बल्कि उसे घर का सबसे पवित्र हिस्सा बताया गया है। मान्यता है कि यहां मां अन्नपूर्णा का वास होता है, जो घर में समृद्धि, शांति और पोषण का आशीर्वाद देती हैं। इसलिए रसोई में बनने वाला हर भोजन शुद्ध, सात्त्विक और नियमों का पालन करते हुए बनाया जाना चाहिए।

बासी आटे में तामसिक ऊर्जा क्यों बढ़ती है? रात का गुंथा आटा सुबह तक वह बासी हो जाता है। उसमें हल्का-सा खमीर भी बनने लगता है। शास्त्रों के अनुसार ऐसा आटा तामसिक माना जाता है। ऐसे आटे को खाने से नकारात्मक ऊर्जा, आलस्य, भारीपन, चिड़चिड़ाहट और क्रोध बढ़ता है।



मां अन्नपूर्णा से जुड़ा विश्वास हमारे घर की रसोई को मां अन्नपूर्णा का स्थान माना गया है। इसलिए भोजन बनाते समय शुद्धता, स्वच्छता और ताजगी का ध्यान रखना आवश्यक है। जब बासी आटे से रोटियां बनाई जाती हैं, तो इससे मां अन्नपूर्णा नाराज होतीं और रसोई की सकारात्मकता कम हो जाती है। रोटी का संबध सूर्य और मंगल ग्रह से ज्योतिष के अनुसार रोटियों का संबंध सूर्य और मंगल ग्रह से माना गया है, क्योंकि रोटी शरीर को ऊर्जा, शक्ति और तेज प्रदान करती है। सूर्य जीवन शक्ति का प्रतीक है, जबकि मंगल उत्साह, साहस और कर्मशीलता का कारक है। इसलिए ताजा आटे से बनी रोटियां सकारात्मक ऊर्जा देती हैं और शरीर को संतुलित रखती हैं।

लेकिन जब आटा फ्रिज में रखकर बाद में उपयोग किया जाता है, तो वह बासी हो जाता है और अपनी सात्त्विकता खो देता है। ज्योतिष में बासी आटे का संबंध राहु से माना गया है। राहु भ्रम, अस्थिरता, मानसिक उलझन और नकारात्मक विचारों का कारक है। ऐसे में जब घर के लोग बासी आटे से बनी रोटियां खाते हैं, तो राहु के प्रभाव के कारण उनके मन में असमंजस, तनाव और आपसी विवाद बढ़ सकता है। इससे घर का माहौल अस्थिर होता है और परिवार में अनबन जैसी स्थितियां उत्पन्न हो सकती हैं। शास्त्रों में स्पष्ट मनाही धर्मसिंधु, निर्णयसिंधु और स्मृतिग्रंथों में लिखा है कि "रात्रौ संध्या समये च यत् भुक्तं तत् बासी भवति।" अर्थात रात को रखा हुआ भोजन या आटा सुबह होने तक बासी माना जाता है और इसका प्रयोग करने से बचना चाहिए।

# 'शोले' नंतर इतके यश कुठल्याच चित्रपटाला मिळाले नाही...',

## 'धुरंधर'च्या निर्मात्या ज्योती देशपांडेंनी केली तुलना; 'धुरंधर २'बद्दल म्हणाल्या...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'धुरंधर'च्या निर्मात्या ज्योती देशपांडे यांनी सांगितले 'धुरंधर २' ५' भाषांमध्ये प्रदर्शित करण्यामागचे कारण, काय म्हणाल्या? घ्या जाणून...

आदित्य धर लिखित व दिग्दर्शित 'धुरंधर' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरचे अनेक रेकॉर्ड तोडले. भारतासह या चित्रपटाने जगभरातही कोट्यवधींची कमाई केली आणि बॉलिवूडमधील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला. चित्रपटाला प्रदर्शित होऊन दोन महिने होऊन गेले, पण तरीसुद्धा ओटीटीवर प्रदर्शित होऊनही प्रेक्षक चित्रपटगृहांत सिनेमा पाहण्यासाठी जात आहेत. अशातच आता चित्रपटाच्या निर्मात्या ज्योती देशपांडे यांनी याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. 'फॉर्च्यून इंडिया'ला दिलेल्या





मुलाखतीत 'धुरंधर'च्या निर्मात्या ज्योती देशपांडे याबद्दल म्हणाल्या, की 'हे फक्त चित्रपटाच्या मेकर्सचे यश नाही, तर प्रेक्षकांचे यश आहे. चित्रपटाला प्रेक्षकांचा इतका प्रतिसाद कित्येक दशकांनंतर मिळाला आहे. प्रेक्षकांनी अनेकदा हा चित्रपट पाहिला आहे आणि आता ६० दिवसांहून अधिक दिवस हा चित्रपट थिएटरमध्ये सुरू आहे.'

### ज्योती देशपांडे यांनी 'शोले' बरोबर केली 'धुरंधर'ची तुलना

ज्योती देशपांडे यांनी पुढे 'धुरंधर'ची तुलना ९०च्या काळातील सुपरहिट चित्रपट 'शोले' बरोबर केली आहे. त्या याबद्दल म्हणाल्या, की 'शोलेनंतर कुठल्या चित्रपटाला इतके यश मिळालेले मी पाहिले नाही. ही गोष्ट आमच्यासाठी कुठल्या पुरस्कारापेक्षा कमी नाही. हे असे काहीतरी आहे, ज्याचे स्क्रिप्टिंग केले जाऊ शकत नाही. या गोष्टीची मार्केटिंग केली जाऊ शकत नाही, पैशाने हे खरेदी करता येत नाही.'

### ...म्हणून ५ भाषांमध्ये प्रदर्शित होणार 'धुरंधर'

ज्योती यांनी पुढे 'धुरंधर'च्या पहिल्या भागाला जर इतका चांगला प्रतिसाद मिळाला नसता तर दुसरा भाग डब्यात गेला असता. पण त्यांना माहीत होते, की 'धुरंधर' चांगली कमाई करणार, असे म्हटले आहे. त्या म्हणाल्या, की 'प्रेक्षकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे आम्ही खूप आनंदी आहोत. आमचा विश्वास आहे की 'धुरंधर २'ला पहिल्या भागापेक्षाही अधिक मोठा प्रतिसाद मिळेल. हा चित्रपट ५ भाषांत प्रदर्शित होणार आहे.'

'धुरंधर २'ला तेलुगू, तमीळ, कन्नड आणि मल्याळम या दाक्षिणात्य भाषांत प्रदर्शित करण्यामागचे कारणही ज्योती देशपांडे यांनी सांगितले आहे. त्या म्हणाल्या, की 'धुरंधरच्या पहिल्या भागाला अभूतपूर्व यश मिळाले आहे. या चित्रपटाने सगळ्या दाक्षिणात्य चित्रपटांना मागे सोडले. दाक्षिणात्य राज्यांमधून 'धुरंधर'ला मिळालेला प्रतिसाद खूप मोठा आहे.' 'धुरंधर २' १९ मार्च २०२६ ला प्रदर्शित होणार आहे.

### मेस्सी आणि 'क्लिनिंग लेडी'

बार्सिलोना क्लबमध्ये एकदा लिओनेल मेस्सी हॉटेल रूममध्ये आला तेव्हा साफसफाई करणारी महिला म्हणाली, की तुम्ही इतके शांत आहात, की तुम्ही खेळाडू वाटतच नाही. मेस्सी हसून म्हणाला, की मी गोलने बोलतो, आवाजाने नाही. दुसऱ्या दिवशी त्याने दोन गोल केले. ती महिला म्हणाली की आवाज नको, गोल पुरेसे बोलतात.



# मुंबईच्या महापौर रितू तावडे कोण आहेत?

## जाणून घ्या त्यांची संपत्ती, शिक्षण, व्यवसाय, राजकीय कार्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर सुमारे १५ दिवसांनी भाजपने अखेर महापौर पदासाठी उमेदवाराचे नाव घोषित केले. महापालिकेच्या कामकाजाचा अनुभव असलेल्या, तसेच संघटनात्मक कामात सक्रिय असलेल्या रितू तावडे यांची भाजपच्या मुंबईतील महापौरपदी बिनविरोध निवड झाली आहे. वाणिज्य शाखेतून द्वितीय वर्षापर्यंत शिक्षण घेतलेल्या रितू तावडे यांचा जन्म १८ एप्रिल १९७३ रोजी झाला. गेल्या अनेक वर्षांपासून त्या भाजपमध्ये कार्यरत असून त्या सामाजिक कार्यात सक्रिय आहेत.



महापौरपदासाठी अर्ज भरण्याच्या शेवटच्या टप्प्यात भाजपने रितू तावडे यांच्या नावाची घोषणा केली. त्या घाटकोपरमधील प्रभाग क्रमांक १३२ मधून निवडून आल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या २०१२ मधील निवडणुकीत त्या विजयी झाल्या होत्या. रितू तावडे यांची मे. आर. आर. इंटरप्राईजेस कंपनी आहे. मुंबई महिला मोर्चा कार्यक्रम समितीच्या त्या संयोजिका होत्या. तसेच, महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष, तर ईशान्य मुंबई महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे. सहारा जनरल कामगार कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून त्यांनी कामगारांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडली. मराठा प्रतिष्ठा संस्थेच्या अध्यक्षा असलेल्या तावडे यांनी अदानी इलेक्ट्रिसिटीविरुद्ध भरमसाठ वीज दरवाढीप्रकरणी आक्रमक आंदोलन पुकारले होते.

### रितू तावडेंची संपत्ती किती?

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज सादर करताना जोडलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांच्या कुटुंबाची एकूण संपत्ती सुमारे ५ कोटी २६ लाख ७६ हजार ४१७ रुपये नमुद करण्यात आली आहे.

# १० वी पर्यंत शिक्षण अन् कॅन्टीनमध्ये काम

## संधी ओळखत व्यवसायाला सुरूवात, उभारले ५००० कोटींचे साम्राज्य

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकेकाळी सिनेमा हॉलच्या कॅन्टीनमध्ये महिन्याला फक्त ९० रुपये कमवत असणाऱ्या व्यक्तीने आज ५००० कोटी रुपयांचे बालाजीचे साम्राज्य उभे केले आहे. चंदुभाई विरानी यांची यशोगाथा कठोर परिश्रम, दृढनिश्चय आणि एका सामान्य सुरुवातीतून एक विशाल व्यवसाय कसा उभा करता येतो, याचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

### १० वी पर्यंत शिक्षण, पहिल्या व्यवसायात अपयश


चंदूभाई विरानी यांनी केवळ १० वीपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यांनी आपल्या सामान्य पार्श्वभूमीतून संधी शोधून बालाजी वेफर्सची स्थापना केली. आज बालाजी वेफर्स हे भारतातील प्रमुख स्नॅक ब्रँड्सपैकी एक आहे, ज्याचे मूल्य तब्बल ५००० कोटी रुपये आहे. १९७२ मध्ये, १५ वर्षांचे असताना, चंदूभाई विरानी आपल्या कुटुंबासोबत राजकोटपासून सुमारे ७९ किलोमीटर दूर जामनगर जिल्ह्यातील धुंडोराजी येथे स्थलांतरित झाले. त्यांचे वडील पोपट विरानी यांनी आपल्या मुलांसाठी आपली नापीक जमीन विकून २० हजार रुपये दिले होते. या पैशातून चंदूभाई आणि त्यांच्या दोन भावांनी, मेघजीभाई आणि भिखूभाई यांनी राजकोटमध्ये शेती उत्पादने आणि शेती उपकरणांचा छोटा व्यवसाय सुरू केला.दुर्दैवाने, हा व्यवसाय दोन वर्षांतच अयशस्वी ठरला.

### व्यवसायाची संधी ओळखली

स्थिर उत्पन्न नसल्यामुळे जीवन खूप कठीण झाले. व्यवसायाच्या अपयशानंतर, चंदूभाई आणि त्यांच्या भावांना नोकरी शोधण्यास भाग पाडले गेले. त्यांनी राजकोटमधील एस्ट्रां सिनेमाच्या कॅन्टीनमध्ये काम करण्यास सुरुवात केली. चंदूभाई यांना दरमहा फक्त ९० रुपये मिळत होते. ते दरवाजा सांभाळण्यापासून ते पोस्टर चिकटवण्यापर्यंत आणि प्रेक्षकांना रस्ता दाखवण्यापर्यंत सर्व कामे करत होते. सिनेमा कॅन्टीनमध्ये काम करताना, चंदूभाई यांनी पाहिले की चित्रपट पाहणाऱ्यांमध्ये बटाट्याचे वेफर्स खूप लोकप्रिय होते. त्यांनी ही संधी ओळखली. त्यांनी आपल्या घराच्या आवारात तब्बल १० हजार रुपयांच्या गुंतवणुकीतून एक छोटा शेड उभारला. त्यांनी एका खोलीच्या घरात चिप्स बनवण्याचे प्रयोग सुरू केले. त्यांचे चिप्स लवकरच लोकप्रिय झाले. ही लोकप्रियता केवळ सिनेमा हॉलमध्येच नाही, तर बाहेरही पसरली.

### बालाजी हे नाव कसे पडले?

मागणी वाढल्यानंतर, चंदूभाई यांनी १९८९ मध्ये राजकोटमधील अजी जीआयडीसी येथे गुजरातची तत्कालीन सर्वात मोठी बटाटा वेफर उत्पादन युनिट स्थापन केली. यासाठी त्यांनी ५० लाख रुपयांचे बँक कर्ज घेतले होते. १९९२ मध्ये तिन्ही भावांनी अधिकृतपणे बालाजी वेफर्स प्रायव्हेट लिमिटेडची स्थापना केली. कंपनीचे नाव त्यांच्या खोलीत ठेवलेल्या भगवान हनुमानाच्या एका लहान मूर्तीच्या नावावरून ठेवण्यात आले होते.



### तिसरी मोठी कंपनी

आज बालाजी वेफर्स हे भारतातील अव्वल स्नॅक ब्रँड्सपैकी एक आहे. कंपनी चार कारखान्यांचे संचालन करते, ज्यांची उत्पादन क्षमता खूप जास्त आहे. कंपनी वार्षिक ६५ लाख किलोग्राम बटाटे आणि १०० लाख किलोग्राम स्नॅक्सची प्रक्रिया करते. ते दर तासाला ३४०० किलोग्राम चिप्सचे उत्पादन करतात. भारतातील ४३००० कोटी रुपयांच्या स्नॅक बाजारपेठेत १२ टक्के वाटा असलेल्या बालाजी वेफर्सने देशातील तिसरी सर्वात मोठी स्नॅक कंपनी म्हणून आपले स्थान निर्माण केले आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# कोल्हापूरनिवासिनी भगवती नक्की कोण?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बऱ्याच वेळा ऐकायला येते, की कोल्हापूरनिवासिनी भगवती नक्की कोण? त्यांना काय म्हणायचे? 'श्री महालक्ष्मी की श्री अंबाबाई'?

महालक्ष्मी म्हटले, तर त्या भगवान विष्णू यांच्या पत्नी आहेत का? शैव पंथीय की वैष्णव पंथीय?

अशी मान्यता आहे, की कोल्हापूरनिवासिनी भगवती ही आदिशक्ति जगन्माता, विश्‍वजननी, जगदंबा, 'अंबाबाई महालक्ष्मी' आहे. कोणी महालक्ष्मी म्हणतात, कोणी अंबाबाई म्हणतात. त्या जगद्उत्पत्ती करणाऱ्या जगद्अंबा आहेत.

'श्री दुर्गा सप्तशती' या ग्रंथात श्री महाकाली-श्री महालक्ष्मी-श्री महासरस्वती यांची उत्पत्ती सांगितली आहे. यात प्राधानिक रहस्यामध्ये चतुर्भुजा भगवतीच्या हातातील आयुधे सांगितली आहेत.


श्री महालक्ष्मी मस्तकावर नाग, योनिलिंग धारण केलेली आणि गदा, खेटक (ढाल), महाळुंग (लिंबूवर्गीय फळ) आणि पानपात्र हातात धारण केलेली आहे. त्यांचे वाहन सिंह आहे.

आपण जी लक्ष्मी पूजनाला पूजन करतो ती लक्ष्मीदेवी भगवान विष्णू यांची पत्नी, चतुर्भुजा आहे. एका हातात कमळ, दुसरा कलश, तिसरा वरदहस्त आणि चौथा धन देणारा, असे धनदा रूप या लक्ष्मीचे. समुद्रमंथनातून हिची उत्पत्ती झाली, असे म्हणतात.

महत्त्वाचे म्हणजे महालक्ष्मी आणि लक्ष्मीदेवी हा फरक आहे. लक्ष्मीदेवींचे 'नारायणी' रूप शंख, चक्र, गदा, पद्मधारी असते.

गोव्यात बांदिवडे येथे श्री महालक्ष्मी मंदिरातील देवी मूर्ती आणि कोल्हापूरनिवासिनींची मूर्ती यात साधर्म्य आहे.

**। श्री महालक्ष्मी नमोस्तुते।**






# पहाटे तुळशीला पाणी का घालावे? काय आहेत कारणे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या पूर्वासुरींनी पहाटे प्रत्येकाने तुळशीला पाणी घालावे, असे सांगितले आहे. त्या पाठीमागे पुढील दोन महत्त्वाची कारणे आहेत.



## आध्यात्मिक महत्त्व

याबाबत पुराणात एक कथा सांगितली जाते. जालिंदर नावाचा एक अत्यंत पराक्रमी राक्षस असतो. आपल्या पराक्रमाच्या बळावर त्याने देवांना आणि साधू-संतांना पार त्राही-त्राही करून सोडलेले असते. त्याला कसे रोखायचे, असा प्रश्न सर्व देवांना पडतो. मग देव भगवान विष्णूंना शरण जाऊन जालिंदरापासून आपले रक्षण करण्याची विनंती करतात.

भगवान विष्णूंनी जेव्हा जालिंदराबाबत माहिती काढली तेव्हा त्यांना असे कळते, की त्याची पत्नी वृंदा ही सतीपतीव्रता असते. तिच्या पातिव्रत्याच्या सामर्थ्यांनेच जालिंदर विजयी होत असतो. त्याला पराजीत करायचे असेल, तर वृंदाच्या पतिव्रत्याचा भंग करणे हाच उपाय उरतो. ते करण्यास कुणीही धजावत नाही. अखेर ती जबाबदारी विष्णू स्वीकारतात. जालिंदराचे रूप धारण करून भगवान विष्णू वृंदेच्या महालात जातात. आपले पती आले आहेत, असे समजून वृंदा त्यांना अलिंगन देते. तिच्या पतिव्रत्याचा भंग होताच जालिंदराचा मृत्यू होतो. देवांनी मारलेल्या बाणाने त्याचे शीर तुटते आणि ते वृंदेच्या दारात पडते. नवऱ्याचे शीर पाहताच वृंदा चकीत होते आणि भगवान विष्णूंना विचारते, तू कोण आहेस? त्यावर विष्णू आपल्या खऱ्या रूपात प्रकटतात. संतप्त झालेली वृंदा विष्णूंना तू दगड होऊन पडशील आणि मला माझ्या पतीचा विरह तुझ्यामुळे घडला, तसाच तुलाही तुझ्या पत्नीचा विरह सहन करावा लागेल, असा शाप देते. भगवंत तिची क्षमा मागतात. तेव्हा वृंदा म्हणते, तू मला आता भ्रष्ट केलेस, आता मला कोण स्वीकारील? तेव्हा भगवंत म्हणतात, ' मी तुझा स्वीकार करतो. इतकेच नव्हे तर जे तुझी पूजा करतील त्यांच्यावर माझी कृपा असेल.' त्यानंतर वृंदा सती गेली. पुढे तिच्या शापामुळेच राम अवतारामध्ये भगवंताला माता सीतेचा विरह सहन करावा लागला. देव दगड होऊन पडले. त्यालाच ' शालिग्राम ' म्हणतात.

ज्या ठिकाणी तिच्यावर अंत्यसंस्कार झाले तेथे तुळशीचे रोप उगवले. तीच ही तुळस. वृंदेच्या नावावरूनच ज्या ठिकाणी तुळस लावली जाते. तिला ' वृंदावन ' असे म्हटले जाते. तीच तुळस भगवान श्रीकृष्ण, पांडुरंग यांनीही धारण केली. तिला भगवंताने स्वीकारले याचे प्रतीक म्हणून ' शालिग्राम ' हा जो दगड आहे त्याला देव मानून त्याचा विवाह तुळशीसोबत लावला जातो. ती भगवंतांची प्रिय होते म्हणूनच तिला धारण करणाऱ्यांवर भगवंत प्रेम करतो, अशी श्रद्धा आहे. याच विचाराने वारक-यांनीही तुळशीला आजतागायत पूजनीय मानले आहे.


## वैज्ञानिक महत्त्व

जगातील प्रत्येक वनस्पती दिवसा ऑक्सिजन-ओ २ व रात्री कार्बन डाय ऑक्साईड-सीओ २ सोडते. अपवाद फक्त पिंपळ, कारण पिंपळ रात्रीही ऑक्सिजन सोडतो. म्हणूनच भगवान श्रीकृष्ण यांनी म्हटले आहे, की सर्व वृक्षांत मी अश्‍वथ-पिंपळ आहे. मात्र तुळस ही जगातील एकमेव वनस्पती आहे की जी दिवसा ऑक्सिजन, रात्री कार्बन डाय ऑक्साईड व फक्त पहाटेच्या वेळी ०.०३ टक्के इतका ओझोन-ओ३ वायू सोडते व या वायूच्या संपर्कात मनुष्य आल्यास त्याच्या मेंदूत ५ एचटी-पीएन-सेरॉटोनीन नावाचे संप्रेरक स्त्रवते. ज्यामुळे मनुष्य दिवसभर प्रसन्न व आनंदी राहतो. तसेच त्याची रोगप्रतिकारक शक्ती बळकट होते. आयुर्वेदानुसार तुळशीमुळे सर्दी, खोकला, ताप, त्वचारोग, मधुमेह, रक्तदाब, पोटाचे व किडनीचे विकार, कँन्सर होत नाहीत. तुळशीच्या बिया, मुळे, खोड, पाने, फुले (मंजिरी) हे सर्वच औषधी आहेत. शिवाय तुळशीतून निघणाऱ्या शुभ स्पंदनांमुळे वातावरण शुद्धी होते. या सर्व बाबींचा गहन विचार करूनच पूर्वासुरींनी पहाटे तुळशीला पाणी घालण्यास सांगितले आहे.

ज्याच्या घरची तुळस फुललेली असते त्याच्या घरी पाण्याचा तुटवडा नसतो. जेथे रोज सायंकाळी दिवे लागण होते तेथे भक्तीची कमतरता नसते. जेथे शुभंकरोती होते तेथे संस्कारांची नांदी असते. जेथे दान देण्याची सवय असते तेथे संपत्तीची कमी नसते. आणि जेथे माणुसकीची शिकवण असते तेथे माणसांची कमी नसते.

# 'गण गण गणात बोते'चा अर्थ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



'शेगावचे संत श्री गजानन महाराज हे नेहमी मधून-मधून 'गण गण गणात बोते', असा मंत्र म्हणत असत. एका शिष्याने महाराजांना त्याचा अर्थ विचारला. श्री गजानन महाराज म्हणाले, की 'पहिला 'गण' म्हणजे जीव किंवा जीवात्मा, दुसरा 'गण' शब्द म्हणजे शिव किंवा शिवात्मा आणि तिसरा शब्द 'गणात' म्हणजे 'हृदयात'. 'बोते' म्हणजे पाहा, बघा.' 'गण गण गणात बोते', याचा अर्थ 'हे जीवा स्वतःच्या हृदयात शिवाला, परमेश्‍वराला बघ.

# पौर्णिमेला यांचे पूजन विशेष लाभदायी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पौर्णिमा म्हणजे भगवान विष्णू, श्री सत्यनारायण व श्री महालक्ष्मी माता यांच्या पूजन व सेवेचा शुभ काळ. या कालावधीत ही खालील सेवा करावी व श्री माता भगवती आईसाहेब महालक्ष्मीच्या कृपेचा अनुभव घ्यावा.

घरच्या घरी शुभ पुण्यकाली प्रदोषकाळी सायंकाळी (सूर्यास्तापूर्वीची व नंतरची २४ मिनिटे म्हणजे प्रदोषकाळ ) श्री सत्यनारायण पूजन तसेच बरोबरच अगोदरच देव्हाऱ्यात शास्त्रोक्त पूजन करून स्थापीत केलेले श्रीयंत्र व कुबेरयंत्र व रुद्र यंत्र पूजन करावे. दिंडोरीप्रणीत सेवामार्गातील सत्यनारायण पोथीप्रमाणे स्वतः घरीच सत्यनारायण पूजा करावी. शिऱ्याचा प्रसाद फक्त घरातच सर्वांनी घ्यावा. बाहेरील कुणास देऊ नये. फक्त आपले कुटुंबीय यांनाच द्यावा.

किमान १६ वेळेस श्रीसूक्त पठण करावे. (बेलाच्या झाडाखाली बसून उत्तर दिशेकडे तोंड करून पठण करता आले तर अती-अती पुण्यदायी).

श्रीयंत्रपूजन व कुंकूमार्चन. श्री ललिता सहस्त्रनाम पठण व श्रीसूक्त पठण करत श्रीयंत्रावर पाच बोटांनी कुंकू वाहावे.

- श्री कुबेर गायत्री मंत्र पठण करीत श्री कुबेर यंत्र पूजन.
- श्री विष्णुसहस्त्रनामपाठ, गीतेचा १५ वा अध्याय, श्री व्यंकटेश स्तोत्र यांचे वाचन व एक माळ श्री विष्णू गायत्री मंत्र जप करावा.

प्रदोष काळातच सत्यनारायण पूजन करणे. इतर सेवा पौर्णिमेच्या पुण्यकाळातच करावे. घरातील सर्व सदस्यांनी मिळून वेळेप्रमाणे दिलेल्या सेवेपैकी थोडी-थोडी वाटून सेवा केली तरी चालते. सत्यनारायण पूजन करतानाच श्रीयंत्र व कुबेर यंत्र व रुद्र यंत्र सुद्धा त्याच चौरंगावर मांडावे. या सेवेने लक्ष्मी प्राप्ती आयुरारोग्य व वास्तूत शुभता निर्माण होते. शुभ स्पंदने निर्माण होऊन वास्तुदोष खूप कमी होतो. कर्ज झालेले असेल तर ते कमी-कमी होऊ लागते. कर्जबाजारीपणातून बाहेर पडण्यासाठी श्री लक्ष्मी- नारायण यांचा आशीर्वाद मिळतो. कष्टास यश मिळू लागते.


**। श्री स्वामी समर्थ**
**गुरूमाऊली चरणार्पणमस्तू ।**



# आंध्र प्रदेशातील यागंती मंदिराचे अंगावर काटा आणणारे गूढ सत्य...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतवर्ष ही संतांची आणि देव-देवतांची भूमी आहे. या पवित्र भूमीच्या प्रत्येक कणात एक इतिहास दडलेला आहे आणि प्रत्येक मंदिराच्या गाभाऱ्यात एक असे रहस्य लपलेले आहे, ज्याचा शोध घेताना मानवी बुद्धी सुद्धा थक्क होते. विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी काही गोष्टींची उत्तरे आजही कोणाला सापडलेली नाहीत. निसर्गाच्या कुशीत, डोंगररांगांच्या मधोमध वसलेल्या अशाच एका गूढ आणि जागृत स्थानाची ही कथा आहे, जिथे दगडाला पाझर फुटतो अस म्हटल्यास वावगे ठरणार नाही आणि पाषाणाची मूर्ती चक्क श्‍वास घेतल्यासारखी दिवसेंदिवस वाढत जाते. हे स्थान म्हणजे आंध्र प्रदेशातील कर्नूल जिल्ह्यात वसलेले 'श्री यागंती उमा महेश्‍वर मंदिर'. हे मंदिर केवळ एक वास्तू नाही, तर ती साक्षात काळाची एक अशी साक्ष आहे, जी आपल्याला भविष्यातील भयानक संकटाची जाणीव करून देत आहे अशी कल्पना आहे .



या मंदिराचा इतिहास तसा खूप प्राचीन, म्हणजेच १५ व्या शतकातील विजयनगर साम्राज्याशी जोडलेला आहे, परंतु या स्थानाचे महात्म्य त्याहूनही जुने आहे. पौराणिक कथेनुसार, या मंदिराची स्थापना महान तपस्वी अगस्त्य ऋषींनी केली होती. अगस्त्य मुनी जेव्हा दक्षिण भारताच्या भ्रमंतीवर होते, तेव्हा त्यांना या निसर्गरम्य ठिकाणी भगवान विष्णूंचे, अर्थात व्यंकटेश्‍वराचे मंदिर बांधण्याची इच्छा झाली. त्यांनी एका भव्य पाषाणाची निवड केली आणि मूर्ती घडवण्याचे काम सुरू झाले. परंतु, नियतीला काही वेगळेच मान्य होते. मूर्ती तयार होत असताना, अगदी शेवटच्या टप्प्यात त्या मूर्तीचा अंगठा अचानक तुटला. शास्त्रानुसार, खंडित मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जात नाही. अगस्त्य मुनींसारख्या महान ऋषींकडून असे का घडले, या विचाराने ते व्यथित झाले आणि त्यांनी तिथेच महादेवाची घोर तपश्‍चर्या सुरू केली. त्यांच्या भक्तीला प्रसन्न होऊन भगवान शंकरांनी त्यांना दर्शन दिले आणि सांगितले, की 'हे मुनीवर, हे स्थान विष्णू क्षेत्रापेक्षा शैव क्षेत्र म्हणून ओळखले जावे, अशीच माझी इच्छा आहे.' शिवाच्या आदेशानुसार, अगस्त्य मुनींनी तिथे उमा-महेश्‍वराची, म्हणजेच अर्धनारीनटेश्‍वराच्या स्वरूपात एकाच शिळेवर शिव आणि पार्वतीची स्थापना केली. असे हे एकमेव मंदिर आहे जिथे शिव आणि पार्वती एकाच पाषाणात विराजमान आहेत. पण या मंदिराची खरी ओळख येथील मुख्य मूर्तीपेक्षा, मंदिराच्या समोर बसलेल्या 'नंदी'मुळे आहे. हिंदू धर्मात नंदी हा महादेवाचे वाहन मानला जातो, जो स्थिर आणि शांत असतो. परंतु, यागंतीचा नंदी काही वेगळाच आहे. स्थानिक लोकांच्या आणि पुजाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी हा नंदी आकाराने खूप लहान होता. भाविक अगदी सहजपणे या नंदीला प्रदक्षिणा घालत असत. पण जसजशी वर्षे उलटली, तसतसे लोकांच्या लक्षात येऊ लागले की नंदीचा आकार बदलत आहे. हा नंदी नुसता दगड नसून तो जिवंत असल्यासारखा वाढत आहे. सुरुवातीला हा लोकांचा भ्रम असावा असे वाटले, पण जेव्हा मंदिराच्या प्रशासनाला नंदीच्या वाढत्या आकारामुळे आजूबाजूचे खांब तोडावे लागले आणि प्रदक्षिणेचा मार्ग बंद करावा लागला, तेव्हा मात्र सर्वांच्या भुवया उंचावल्या. पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी जेव्हा याचे सर्वेक्षण केले, तेव्हा त्यांनाही धक्का बसला. त्यांच्या नोंदीनुसार हा नंदी दर २० वर्षांनी साधारणपणे एक इंच वाढत आहे. पूर्वी जेथे मोकळी जागा होती तेथे आज या नंदीचे विशाल पोट आणि भव्य शिंगे पसरलेली आहेत.

या वाढत्या नंदीमागे एक भयानक भविष्यवाणी दडलेली आहे, जी ऐकून आजही लोकांचा थरकाप उडतो. भारताचे नॉस्ट्राडॅमस म्हणून ओळखले जाणारे महान भविष्यवेत्ते संत श्री पोतुलुरी वीरब्रह्मेंद्र स्वामी यांनी आपल्या 'कालज्ञानम' या सुप्रसिद्ध ग्रंथात लिहून ठेवले आहे की, यागंती मंदिरातील हा बसवन्ना (नंदी) कलयुगाच्या शेवटी जिवंत होईल. ज्या दिवशी कलियुगाचा अंत जवळ येईल, त्या दिवशी हा दगडी नंदी हंबरडा फोडेल आणि साक्षात ओरडेल. त्याचा तो आवाज विश्‍वाच्या विनाशाची नांदी असेल. त्या दिवशी या नंदीच्या शरीरातून प्राणशक्ती जागृत होईल आणि लाखो घोडेस्वारांच्या सैन्यासह कल्की अवतार प्रकट होईल. ही भविष्यवाणी आजही हजारो भाविकांच्या मनात घर करून आहे, आणि म्हणूनच लोक या नंदीकडे केवळ कुतूहल म्हणून नाही, तर भयाने आणि आदराने पाहतात.

या मंदिराचे आणखी एक मोठे रहस्य म्हणजे इथे न दिसणारे कावळे. तुम्ही जगाच्या पाठीवर कुठेही जा, तुम्हाला कावळे दिसतीलच. पण यागंती मंदिराच्या परिसरात तुम्हाला एकही कावळा दिसणार नाही. यामागेही एक रंजक कथा आहे. जेव्हा अगस्त्य मुनी येथे तपश्‍चर्या करत होते, तेव्हा कावळ्यांच्या एका थव्याने त्यांच्या ध्यानात विघ्न आणले. त्यांच्या कर्कश आवाजाने मुनींचे लक्ष विचलित झाले. क्रोधीत होऊन अगस्त्य मुनींनी त्या कावळ्यांना शाप दिला, की 'आजपासून या क्षेत्रात कोणत्याही कावळ्याचा प्रवेश होणार नाही.' तेव्हापासून आजतागायत यागंतीच्या परिसरात कावळा शिवत नाही. विशेष म्हणजे शनी देवाचे वाहन कावळा असल्याने, असे मानले जाते की ज्या व्यक्तीला शनीची साडेसाती किंवा दोष आहे, त्यांनी या मंदिरात दर्शनासाठी आल्यास त्यांचा शनिदोष दूर होतो. कारण येथे शनी देवाचा प्रभाव पडत नाही.

मंदिराच्या परिसरात असलेल्या नैसर्गिक गुहा या वातावरणातील गूढता अधिकच वाढवतात. येथे अगस्त्य गुहा, व्यंकटेश्‍वर गुहा आणि वीरब्रह्मेंद्र गुहा आहेत. या गुहांची उंची कमी असल्याने आत जाताना रांगत जावे लागते. आजही अनेक साधू-संत या गुहांमध्ये अदृश्य रूपात वावरतात आणि तपश्‍चर्या करतात, अशी लोकांची श्रद्धा आहे. मंदिराच्या आवारात एक पुष्करिणी (पाण्याचे कुंड) आहे, ज्यात बाराही महिने पाणी असते. हे पाणी कुठून येते, याचा उगम आजही कोणाला सापडलेला नाही. नंदीच्या मुखातून पडणारे हे पवित्र जल भाविकांचे सर्व रोग बरे करते, अशी ख्याती आहे.

इतके सगळे चमत्कार आणि कथा ऐकल्यानंतर, साहजिकच आजच्या विज्ञान युगातील मानवाच्या मनात प्रश्न निर्माण होतो की, दगडाची मूर्ती खरोखरच वाढू शकते का? की यामागे काही वैज्ञानिक कारण आहे? भाविकांसाठी हा साक्षात देवाचा चमत्कार असला तरी, विज्ञानाकडे याचे एक तार्किक स्पष्टीकरण देखील आहे, जे समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.

जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया आणि अनेक भूगर्भशास्त्रज्ञांनी या मूर्तीचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांच्या संशोधनानुसार, ज्या खडकापासून हा नंदी बनवला गेला आहे, तो कोणताही सामान्य दगड नसून त्याचे गुणधर्म वेगळे आहेत. या खडकामध्ये 'सिलिका' आणि 'लोह' या खनिजांचे प्रमाण भरपूर आहे. विज्ञानाच्या भाषेत सांगायचे तर, हा खडक नैसर्गिकरित्या 'विस्तारणारा' प्रकारचा आहे. जेव्हा वातावरणातील आर्द्रता किंवा ओलावा या खडकाच्या संपर्कात येतो, तेव्हा त्यातील खनिजांमध्ये रासायनिक अभिक्रिया होते. यालाच 'लीचिंग' किंवा रासायनिक प्रसरण असेही म्हणतात. या प्रक्रियेमुळे खडकाचे कण हळूहळू फुलतात आणि त्यामुळे मूर्तीचा आकार काही मिलिमीटरने वाढत जातो. ही प्रक्रिया रातोरात घडत नाही, तर ती सतत आणि अत्यंत संथ गतीने चालणारी नैसर्गिक भूगर्भीय प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया केवळ यागंतीपुरती मर्यादित नसून, अशा प्रकारच्या खडकांमध्ये जगभरात कुठेही घडू शकते.

त्यामुळे, एका बाजूला विज्ञानाचा हा ठोस पुरावा आहे की, खनिजांच्या रासायनिक बदलांमुळे मूर्तीचा विस्तार होत आहे. तर दुसऱ्या बाजूला, हजारो वर्षांची परंपरा आणि 'कालज्ञानम'ची भविष्यवाणी आहे, जी सांगते की हा नंदी कलयुगाच्या अंताचा साक्षीदार आहे. विज्ञान त्याचे काम करत राहील आणि श्रद्धा तिचा मार्ग शोधत राहील. पण एक गोष्ट मात्र नक्की, की यागंतीचा हा नंदी मानवी अस्तित्वाला आणि निसर्गाच्या शक्तीला शरण जायला भाग पाडतो. दगडात देव आहे की नाही हे ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा भाग आहे, पण तो दगड जिवंत असल्यासारखा वाढतोय, हे सत्य मात्र कोणीही नाकारू शकत नाही.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)